लोकमत

# लिहितकर यांचा गौरव

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या



ग्रंथालय व माहितीशास्त्र अधिविभागाच्या प्रमुख डॉ. शालिनी लिहितकर यांना नवी दिल्ली येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेत 'इंडियन लायब्ररी लीडर्स अवॉर्ड फॉर प्रोफेशनल एक्सलन्स' हा प्रतिष्ठेचा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

नवी दिल्ली येथे १९-२० एप्रिल रोजी दिल्ली ग्रंथालय संघ आणि सतीजा रिसर्च फौंडेशन फॉर लायब्ररी अँड इन्फर्मेशन सायन्स यांच्यातर्फे तिसरी ग्रंथालय व माहितीशास्त्र आंतरराष्ट्रीय परिषद घेण्यात आली. परिषदेत ग्रंथालय व माहितीशास्त्राच्या क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान दिल्याबद्दल डॉ. शालिनी लिहितकर यांना शिक्षणतज्ज्ञ अशोक बेरी यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी डॉ. एम. मणी, पी. बी. मंगला, एम. पी. सतीजा, सी. पी. बसिष्ठ, डॉ. आर. के. शर्मा, के. पी. सिंग, आदी उपस्थित होते.

Hello Kolhapur
Page No. 2 May 04, 2019
Powered by: erelego.com

# शाहू पुण्यतिथीनिमित्त सोमवारी व्याख्यान

कोल्हापूर : राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या ९७व्या पुण्यतिथीच्या औचित्याने सोमवारी (दि. ६) व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. 'राजर्षी छत्रपती शाहू महाराज आणि बहुजन पत्रकारिता' या विषयावर डॉ. आलोक जत्राटकर विचार मांडणार आहेत. दसरा चौकातील शाहू स्मारक भवनमधील मिनी सभागृहात सायंकाळी सहा वाजता होणार आहे. अध्यक्षस्थानी 'लोकमत' कोल्हापूरचे संपादक वसंत भोसले असणार आहेत.

# विद्यापीठ सेवक संघाच्या नूतन कार्यकारिणीची निवड

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठाच्या नूतन कार्यकारिणीची निवड वार्षिक सर्वसाधारण सभेत मंगळवारी करण्यात आली. २०१९ ते २०२१ या कालावधीच्या या कार्यकारिणीच्या अध्यक्षपदी बाबा सावंत यांची अध्यक्ष म्हणून, तर उपाध्यक्ष संभाजी कांबळे यांची उपाध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली आहे.

उर्वरित कार्यकरणीमध्ये सरचिटणीस - राम तुपे, सहचिटणीस विशांत भोसले आणि शशिकांत साळोखे, खजानिस सुरेश पाटील आणि प्रसिद्धी सचिव म्हणून सुनील जाधव यांची निवड करण्यात आली आहे. त्याचबरोबर सदस्यपदी राजेंद्र चव्हाण, विजय पाटील, दीपक काशीद, संजय शेळके, संदीप हेगडे, जनार्दन सुरकुले, शिरीष देसाई, राजेंद्र खामकर, राजेश चव्हाण, चंद्रशेखर खामकर यांची. प्रसिद्धी व नियोजन समितीमध्ये अजय आयरेकर, अनिल साळोखे, सदानंद माने, सल्लागार मंडळात महेश सणगर, शफिक देसाई, प्रमोद चव्हाण, देवयानी यादव, सुरेखा आडके, निमंत्रितांमध्ये रमेश पोवार, संभाजीराव जगदाळे, विलास सांवत, अरुण माने, सदाशिव मोरे, महिला प्रतिनिधींमध्ये वर्षा माने, सुनिता यादव, शीतल सरनाईक आणि महासंघ प्रतिनिधींमध्ये अतुल ऐतावडेकर व अमोल घुणके यांचा समावेश आहे.

सकाळ

# कोल्हापुरी गूळ, चपलांवर संशोधन व्हावे

## राज्यपाल सी. विद्यासागर राव; विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांची भेट

**कोल्हापूर, ता. ३ : शिवाजी विद्यापीठात ऊस, कोल्हापुरी चप्पल आणि गूळ संशोधन व्हावे. तेथील शेतकरी, चर्मकार आणि कामगार यांचे जीवनमान उंचावण्यासाठी प्रयत्न झाले पाहिजेत, अशी अपेक्षा राज्यपाल सी. विद्यासागर राव यांनी व्यक्त केली. आज शिवाजी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांनी राज्यपालांची भेट घेतली. या वेळी त्यांनी राज्यपालांना गेल्या दीड वर्षात विद्यापीठामध्ये केलेल्या विकासकामांची माहिती दिली.**



**मुंबई : राज्यपाल सी. विद्यासागर राव यांचा सत्कार करताना अमित कुलकर्णी. सोबत (डावीकडून) लोबाजी भिसे, डॉ. चंद्रशेखर कारंडे, संजय जाधव, अॅड. धैर्यशील पाटील, डॉ. धनाजी कणसे, डॉ. भारती पाटील, डॉ. विवेक खानझोडे.**

शिवाजी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या नव्या सदस्यांना पदभार स्वीकारून दीड वर्ष झाले. या कालावधीत विद्यार्थी हिताच्या ज्या योजना, उपक्रम राबवले गेले, त्याची माहिती राज्यपालांना देण्यासाठी व्यवस्थापन परिषदेच्या आठ सदस्यांनी आज राज्यपाल सी. विद्यासागर राव यांची भेट घेतली. सायबर सिक्युरिटी सेंटरचा अभिनव उपक्रम राबवणारे देशातील एकमेव विद्यापीठ आहे. खेळाडू विद्यार्थी विमा, संशोधनपर शिष्यवृत्ती अशा विविध योजनांची माहिती दिली. राज्यपालांनी या सर्व उपक्रमांबद्दल सकारात्मक प्रतिक्रिया व्यक्त केली. तसेच विद्यापीठात ऊस, गूळ, कोल्हापुरी चप्पल याबद्दल मूलभूत संशोधन व्हावे, ज्यामुळे येथील शेतकरी, चर्मकार आणि कामगार यांचे जीवनमान उंचावेल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

यावेळी अमित कुलकर्णी, लोबाजी भिसे, डॉ. चंद्रशेखर कारंडे, संजय जाधव, अॅड. धैर्यशील पाटील, डॉ. धनाजी कणसे, डॉ. भारती पाटील, डॉ. विवेक खानझोडे उपस्थित होते.

### विद्यापीठात अशीही चर्चा

विद्यापीठ प्रशासन, कुलगुरू यांच्यावर जे आरोप होत आहेत, त्याबद्दल प्रशासनाची बाजू मांडण्यासाठी व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांनी राज्यपालांची भेट घेतल्याची चर्चा दिवसभर विद्यापीठ प्रशासनाच्या कर्मचाऱ्यांत सुरू होती. मात्र, यात कोणतेही तथ्य नसल्याचा खुलासा व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांनी केला.

4 MAY 2019
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

तरुण भारत



कोल्हापूर : राज्यपाल सी. विद्यासागर राव यांच्या सदिच्छा भेटीदरम्यान शिवाजी विद्यापीठ विकासकामाचा अहवाल राज्यपाल यांच्याकडे सादर करताना व्यवस्थापन परिषदेचे सदस्य अमित कुलकर्णी, लोबाजी भिसे, डॉ. कारंडे आदी.

# व्यवस्थापन परिषद सदस्यांनी घेतली राज्यपालांची भेट

- विकासकामांची माहिती सादर
- उद्योगावर संशोधन करून समाजहित साधण्याच्या राज्यपालांकडून सूचना

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठामधील व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांनी गुरुवारी राजभवनमध्ये जावून राज्यपाल सी. विद्यासागर राव यांची सदिच्छा भेट घेतली. या भेटीदरम्यान झालेल्या चर्चेत परीक्षेसाठी तयार केलेले सायबर सिक्युरिटी सेंटर, रूसा अंतर्गत संशोधन आदी विद्यार्थी केंद्रीत विषयाची माहिती राज्यपालांना सादर केली. यावेळी त्यांनी समाधान व्यक्त करीत, औद्योगिक क्षेत्रात संशोधन करून समाजजीवन उंचावण्यासाठी प्रयत्न करण्याच्या सूचना दिल्या.

शिवाजी विद्यापीठातील व्यवस्थापन परिषदेची स्थापना झाल्यापासून पहिल्यांदाच राज्यपाल राव यांची व्यवस्थापन परिषदेच्या ८ सदस्यांनी सदिच्छा भेट घेतली. विद्यापीठाने आतापर्यंत रूसा अंतर्गत संशोधन, प्राथमिक सोयी-सुविधा उपलब्ध केल्या आहेत. तसेच स्वनिधीतून संशोधनालाही चालना दिली आहे. विद्यार्थी केंद्रीत कोणती विकासकामे केली याचा आढावा राज्यपालांना दिला. कोल्हापुरात मोठ्या प्रमाणात औद्योगिक उद्योग असल्याने ऊस, गूळ आणि क्लस्टर उद्योगातील संशोधन करून, विद्यार्थी, कष्टकऱ्यांचे जीवन उंचावण्यावर भर देण्याचा सल्ला राज्यपालांनी दिला.